**कृपया प्रसिध्दीसाठी** **24 सप्टेंबर 2012**

**भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.राम नाईक यांनी <u>पत्रकार परिषदेत मुंबई येथे 24 सप्टेंबर 2012 रोजी वितरीत केलेले निवेदन.</u>**

***उड्डाण (एलिव्हेटेड) रेल्वेचे मृगजळ - राम नाईक***

**मुंबई, सोमवार :**''मुंबईच्या 72 लाख उपनगरी प्रवाश्यांच्या दृष्टीने उड्डाण (एलिव्हेटेड) रेल्वे म्हणजे मगृजळ आहे. त्याऐवजी रेल्वेने हाती घेतलेले प्रकल्प युध्दपातळीवर पूर्ण करावेत तसेच प्रवाश्यांना विश्वासात घेण्यासाठी मुंबई उपनगरी रेल्वेची श्वेतपत्रिका काढावी,''अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे नेते आणि माजी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) श्री.राम नाईक यांनी मुंबईत आज पत्रकार परिषदेत केली. उपनगरी प्रवाश्यांच्या मागण्यांच्या संदर्भात चर्चा करण्यासाठी नवे रेल्वे मंत्री श्री.सी.पी.जोशी यांची भेटही श्री.नाईक यांनी मागितली आहे.

उपनगरी रेल्वेच्या प्रश्नांसंबंधी अधिक माहिती सांगताना श्री.राम नाईक म्हणाले,''गेल्या आठवड्यात वृत्तपत्रातून उड्डाण रेल्वेसंबंधी उलटसुलट बातम्या आल्या आहेत. पश्चिम रेल्वेवर चर्चगेट ते विरार उड्डाण रेल्वेच्या रु.18 हजार कोटींच्या प्रकल्पासाठी पंतप्रधान कार्यालयाने मंजुरी दिली असल्याचे सांगण्यात आले आहे, तर मध्य रेल्वेवर छत्रपती शिवाजी टर्मिनल ते कल्याण उड्डाण रेल्वेचा रु.32 हजार कोटींचा प्रकल्प रेल्वे बोर्डाने नामंजुर केला आहे अश्या बातम्या आहेत. हा प्रकल्प पश्चिम रेल्वेवर होणार तर मध्य रेल्वेवर का नाही असा पहिला प्रश्न निर्माण होतो. त्याच बरोबर हा प्रकल्प रेल्वे, राज्यसरकार आणि खासगी भांडवलदारांच्या सहकार्याने निर्माण होणार असून त्या गाडया फक्त वातानुकुलित असून प्रकल्प पूर्ण होण्यास निदान सात - आठ वर्षे तरी लागतील. तसेच त्याचे भाडे उपनगरात राहणा-या कामगार आणि निम्नमध्यमवर्गीयांना परवडेल का असाही कळीचा मुद्दा आहे. त्या संकल्पित भाडयात आणि सध्याच्या उपनगरी गाडयांच्या भाडयात जास्त फरक असेल तर उड्डाण रेल्वे गाडयांना पुरेसे प्रवासी मिळतील की नाही असा ही प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे उड्डाण रेल्वेवर व्यापक चर्चा होण्याची गरज आहे.

''महाराष्ट्र सरकारच्या दोन्ही मेट्रो रेल्वे प्रकल्पांच्या वाहतुक सुरु करण्याच्या उद्दिष्टांच्या तारखा उलटुन गेल्या तरीही पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंह यांनी 21 जून 2006 रोजी भूमिपूजन केलेल्या वर्सोवा - अंधेरी - घाटकोपर प्रकल्पाचे काम पूर्ण झालेले नाही तर राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांनी 18 ऑगस्ट 2009 रोजी भूमिपूजन केलेल्या चारकोप - वांद्रे - मानखुर्द प्रकल्पाचे प्रत्यक्ष काम अद्यापही सुरु झालेले नाही. या पार्श्वभूमिवर उड्डाण रेल्वेचे प्रकल्प म्हणजे मृगजळच म्हणावे लागेल. उड्डाण रेल्वे सारख्या महत्वाच्या प्रकाल्पाबद्दलची माहिती पंतप्रधान कार्यालय, मुख्यमंत्री, रेल्वे मंत्री किंवा रेल्वे बोर्ड अध्यक्ष या माध्यमातून अधिकृतपणे जनतेसमोर का आली नाही हे मला वाटणारे गूढच आहे,''असे ही श्री.राम नाईक म्हणाले.

उपनगरी रेल्वे प्रकल्पासंबंधी पुढे बोलताना श्री.राम नाईक म्हणाले,''मी रेल्वे राज्यमंत्री (स्वतंत्र प्रभार) असताना मुंबई रेल्वे विकास प्राधिकरणाची स्थापना करुन मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प (एमयुटीपी) हाती घेतला होता. डॉ.मनमोहन सिंग पंतप्रधान झाल्यानंतर या प्रकल्पातील योजनांचे कुर्मगतीने होणा-या प्रगतीचे मुंबईचे रेल्वे प्रवासी साक्षीदार आहेत इतकेच नव्हे तर ते भुक्तभोगीही आहेत. प्रकल्पाचा सुरुवातीचा अपेक्षित खर्च रु.3,125 कोटीवरुन रु.4,174 म्हणजे रु.1,049 कोटीनी वाढला आहे. विरार - डहाणू रेल्वेमार्गाच्या रुंदी करणाचे काम पूर्ण होऊन 17 महिने उलटले तरी चर्चगेटहून डहाणूपर्यंत उपनगरी गाडी धावायला मुहूर्त सापडलेला नाही. पश्चिम रेल्वेवरील विद्युत्प्रवाह डी.सी. च्या ऐवजी ए.सी. मध्ये परिवर्तित झाला असूनही सध्या गाडयांचा असलेला दर ताशी वेग 80 किलोमीटरवरुन 100 करण्यात आला नाही. तसे केल्यास वेळापत्रकात बदल करुन प्रवाश्यांचा वेळ तर वाचेलच परंतु गाडयांच्या फे-याही वाढतील. मुंबईच्या 72 लाख प्रवाश्यांना थोडे तरी समाधान द्यावयाचे असल्यास विनाविलंब चर्चगेट - डहाणू लोकल सेवा सुरु केली पाहिजे तसेच एमयुटीपी एक व दोनचे अपूर्ण असलेले प्रकल्प ख-या अर्थाने युध्दस्तरावर पूर्ण केले पाहिजेत. याशिवाय उपनगरी रेल्वची विद्यमान परिस्थिती प्रवाश्यांना समजण्यासाठी रेल्वेने श्वेतपत्रिका ही (White Paper) काढण्याची गरज आहे.''

''नवे रेल्वे मंत्री श्री.सी.पी.जोशी यांना मुंबईच्या समस्या माहित व्हाव्यात म्हणून त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी वेळ मागितला आहे,''असे ही श्री.राम नाईक यांनी सांगितले.

**(कार्यालय सचिव)**